MHKO030051192018

**सं.फौ.ख.क्र.४३२४/२०१८.**

**नि.क्र.३६/ब.**

**महाराष्ट्र शासन**

***वि रू ध्द***

**शुभम दिपक मुळीक व इतर.**

# न्या य नि र्ण य

**(घोषित दि.१३ मार्च, २०२६ रोजी.)**

अभियोग पक्षातर्फे विद्वान सरकारी वकील आणि आरोपींतर्फे विद्वान वकील यांचा सखोल युक्तिवाद ऐकला. वरील सर्व बाबींचा विचार केल्यानंतर व दोन्ही पक्षांचा सखोल युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निर्णायीत करावयाचे मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्षाने सिध्द केले का की, दि.०६/०९/२०१७ रोजी ०३.३० ते ०६.०० वा.चे दरम्यान तुम्ही आरोपी क्र.०२ ते ०८ हे मयत आरोपी क्र.०१ सोबत मिरजकर तिकटी ते गंगावेश, कोल्हापूर या मार्गावर अनंत चतुर्दशीच्या गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये सहभागी होऊन मिरवणुकीसाठी देण्यात आलेल्या परवान्यातील नियम व अटींचा भंग केला तसेच बंदोबस्तावरील पोलीसांनी दिलेल्या आदेशांकडे दुर्लक्ष करुन मिरवणुक मार्गावर मिरवणुक अखंडीतपणे सुरु ठेऊन सार्वजनिक उपद्रव केला ? | **नाही.** |
| ०२. | कोणता आदेश ? | **निर्दोष मुक्तता.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक ०१ व ०२ करिता</u>**

**०२.** आरोपी क्र.०१ ते ०८ यांच्यावर असलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने एकूण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे. आरोपी क्र.०४ ते ०८ यांचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले. तसेच आरोपी क्र.०२ व ०३ हे गु.र.क्र.२७/२०२६, राजारामपुरी पो.ठा. या कामी न्यायालयीन कोठडीमध्ये दाखल आहेत. त्यामुळे सदर आरोपींचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणे निवेदन व्हिडीओ कॉलद्वारे नोंदविण्यात आले. तसेच आरोपी क्र.०१ हा मयत असल्याबाबतचा दाखला अभिलेखावर दाखल असल्याने त्याच्याविरुध्द सदरचे प्रकरण अवसान पावले. तसा आदेश नि.क्र.०१ लगत पारीत करण्यात आला आहे.

**०३.** साक्षीदार क्र.०१ चेतन दिलीप बोंगाळे (फिर्यादी) यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, दि.०६/०९/२०१७ रोजी ते मिरजकर तिकटी ते गंगावेश येथे डयुटीवर कार्यरत असताना रात्री ०३.३० ते ०६.०० वा.चे दरम्यान त्या मार्गावर बी.जी.एम. सुभाषनगर या गणेश मंडळाने स्पीकर चालू ठेवला होता. मंडळाच्या कार्यकर्त्यांना, पदाधिका-यांना व स्पीकर ऑपरेटर यांना त्यांनी स्पीकर बंद करण्याची विनंती केली. परंतु स्पीकर बंद केले नाहीत. मंडळाला फौ.प्र.सं.कलम १४९ प्रमाणे नोटीस दिली होती. सदर मंडळाने त्यांच्या सुचनांकडे दुर्लक्ष करुन स्पीकर चालूच ठेवले. दि. ०७/०९/२०१७ रोजी सदर मंडळाविरुध्द पोलीस ठाण्यात फिर्याद (नि.क्र.२८) दिली. प्रथम खबर अहवाल (नि.क्र.२९) नोंदविला.

**०४.** साक्षीदार क्र.०२ विकास लक्ष्मण जाधव (साक्षीदार) यांच्या साक्षीत असे आले की, दि.०५/०९/२०१७ रोजी ते जुना राजवाडा पोलीस ठाणे येथे कार्यरत असताना त्यांना ध्वनी मापक यंत्राद्वारे साऊंड सिस्टीमची मोजमाप करण्याची डयुटी दिली होती. दि.०६/०९/२०१७ रोजी रा.०३.३० ते ०६.०० या कालावधीमध्ये

मिरजकर तिकटी ते गंगावेश या मार्गावर बी.जी.एम. सुभाषनगर या गणेश मंडळाने स्पीकर चालू ठेवला होता. मंडळाच्या कार्यकर्त्यांना, पदाधिका-यांना व स्पीकर ऑपरेटर यांना स्पीकर बंद करण्याची विनंती केली. परंतु त्यांनी स्पीकर बंद केले नाहीत. त्यांनी सोबत ध्वनीमापक यंत्र नेले होते. सदर मंडळाने त्यांच्या सुचनांकडे दुर्लक्ष करुन स्पीकर चालूच ठेवले. दि.०७/०९/२०१७ रोजी सदर मंडळाविरुध्द पोलीस ठाण्यात चेतन बोंगाळे यांनी फिर्याद दिली.

**०५.** सदर दोन्ही साक्षीदारांचा उलटतपास घेतला असता त्यांनी मान्य केले आहे की, बंदोबस्तला जातेवेळी त्यांनी स्टेशन डायरीला नोंद केली होती. मिरवणुक मार्गावर बरेच ट्रॅक्टर, बैलगाडी व इतर वाहनांची वर्दळ होती. इतर मंडळांनी देखील डॉल्बी स्पीकर लावले होते. मिरवणुक मार्गावरील रहिवासी माणसांची लेखी अथवा तोंडी तक्रार आलेली नव्हती. मिरवणुक मार्गावर ब-याच मंडळांनी डॉल्बी स्पीकर लावल्यामुळे त्याचा आवाज एकाच दिशेने येत होता. सर्व मंडळांना गणेशउत्सवाची परवानगी देत असताना ठराविक डेझिबल पर्यंत परवानगी दिलेली असते. पंचनामा त्यांच्यासमक्ष झालेला नाही.

**०६.** न्यायालयीन पटलावर आलेल्या पुराव्याच्या आधारे आरोपींविरुध्द कोणताही गुन्हा सिध्द होत नाही. तसेच सदर साक्षीदारांची साक्ष अभियोगपक्षाला पुरक ठरत नाही. अभियोगपक्ष आरोपींविरुध्द दोषारोप सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. साक्षीदारांना वारंवार साक्षीसमन्स काढून देखील ते सदर कामी उपस्थित राहिलेले नाहीत. सबब, आरोपींनी अनंत चतुर्दशीच्या गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये सहभागी होऊन मिरवणुकीसाठी देण्यात आलेल्या परवान्यातील नियम व अटींचा भंग केला तसेच बंदोबस्तावरील पोलीसांनी दिलेल्या आदेशांकडे दुर्लक्ष करुन मिरवणुक मार्गावर मिरवणुक अखंडीतपणे सुरु ठेऊन सार्वजनिक उपद्रव केला ही बाब सिध्द झालेली नाही. न्यायतर्क शास्त्रानुसार फौजदारी प्रकरणात संशयाच्या फायदा हा आरोपीपक्षास जातो. सदर कामी आलेला पुरावा हा संशयी स्वरुपाचा वाटतो. त्यामुळे त्याचा फायदा

आरोपी पक्षास देणे न्यायोचित वाटत आहे. म्हणुन मुद्दा क्र.०१ चे निष्कर्ष नकारार्थी देत असुन मुद्दा क्र.०२ चे निष्कर्षाप्रत पुढील आदेश पारीत करत आहे -

## <u>आ दे श</u>

**०१.** आरोपी क्र.०२ ते ०८ यांची भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६/१३४, ३३(एन)(आर)/१३१, ६८/१४० अन्वये अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**०२.** आरोपींचे जामीन कतबे व बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

**०३.** आरोपी.०१ हा मयत असल्याने सदरचे प्रकरण त्याच्याविरुध्द अवसान पावले.

**०४.** आरोपींनी भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रू.१५,०००/- चे वैयक्तीक जातमुचलके द्यावेत.

*(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)*

Digitally signed by SHILPA VISHVESH KULKARNI
Date: 2026.03.17 11:27:22 +0530

( शिल्पा वि. कुलकर्णी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१४, कोल्हापूर.

दि.१३/०३/२०२६.